|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## निवडणूक शाखा

# परिपत्रक क्र. ७५ /२०२३

## मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे इत्यादिबाबतची सविस्तर नियमावली

***संदर्भ :-*** *अधिसूचना क्र.निवडणूक ७३/२०२३ दि. २०.०२.२०२३*

सर्व संबंधितांना या परिपत्रकान्वये कळविण्यांत येते महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३० (४) (च), ३० (४) (छ), ३० (४) (ज) व ३० (४) (झ) नुसार अधिसभा सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरिता संदर्भिय अधिसूचनेनुसार निवडणूक सूचना (Notice of Election) प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात अधिसभेची बैठक दि. १६ मार्च, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येत आहे. सदर सभेच्या बैठकीत वर नमूद केल्याप्रमाणे मतदान व मतमोजणी प्रक्रिया त्यात प्रामुख्यांने मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका वैध/अवैध ठरविणे इ. बाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीन्वये शासनाने दिनांक १७ मे, २०१७ रोजी निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यांत येत आहेत :

### -: मतदारांसाठी महत्वाच्या सूचना : -

### (A) मतपत्रिकेवर मत नोंदविणे:-

(१) प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल.

(२) मतदार त्याचे मत नोंदवतांना :

(क) 'पसंतीक्रम' या स्तंभात ज्या उमेदवाराला मतदान करील त्या उमेदवाराच्या नावासमोर त्याच्या मतपत्रिकेवर अंक '१' नमूद करील;

(ख) याशिवाय, त्याला जेवढया अन्य उमेदवारांना मत द्यायचे असेल त्यांच्या संबधित नावासमोर त्याची निवड किंवा पसंतीक्रम अंक '२', '३', '४' असे सलग अंक नमूद करुन दर्शवेल;

(ग) एक मतपत्रिकेवर दोन भाषेत पसंतीक्रम नमूद करु नयेत व सर्व पसंतीक्रम एक तर इंग्रजी भाषेत किंवा मराठी भाषेत नमूद करेल.

(घ) पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करू नये.

(३) पसंती क्रमांक नोंदविण्यासाठी जो पेन पुरविला जाईल, त्याच पेनने पसंती क्रम नोंदवायचा आहे.

(४) मतपत्रिकेवर पसंती क्रमांक १ नोंदविणे आवश्यक आहे.

(५) मतदानासाठी देण्यांत येणा-या सर्व मतपत्रिकांवर मतदारांनी त्यांच्या पसंतीनुसार क्रमांकाची नोंद अंकी (जसे - 1, 2 किंवा १, २) स्वरुपात करावी. पसंतीदर्शक आकडे अंकातच इंग्रजी किंवा मराठी या पैकी कोणत्याही एका भाषेत परंतु एकाच पध्दतीने लिहिणे आवश्यक आहे. पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करु नये. मतदाराने आपल्या पसंतीचे प्रथम क्रमांकाचे मत हे मतपत्रिकेवर नोंदवलेच पाहिजे. तसे न केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

**(B) मतपत्रिका अवैध ठरणे :-**

**मतपत्रिकेत जर .......**

क) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' दर्शवण्यात आला नसेल,

किंवा

ख) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आला असेल,

किंवा

ग) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' व काही अन्य अंक एकाच उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आले असतील;

किंवा

घ) प्रथम पसंतीक्रम किंवा त्यापुढील पसंतीक्रम, शब्दात किंवा रोमन अंकात किंवा इंग्रजी किंवा मराठी भाषा वगळून कोणत्याही अन्य भाषेच्या अंकात दर्शविण्यात आले असतील;

किंवा

ड) प्रथम पसंतीक्रम नोंदवण्यात आलेला उमेदवार निर्धारित करता येत नसेल;

किंवा

च) मतदाराने निवडणुकीमध्ये मतपत्रिकेवर जे नंतर ओळखता येईल असे कोणतेही चिन्ह नमूद केले असेल;

किंवा

छ) निळया शाईखेरीज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शविली असेल;

किंवा



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

ज) मतदाराची पसंती दर्शविणाऱ्या अंकांमध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवागिरव किंवा फेरफार केला असेल;

किंवा

झ) मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविल्यावर सदर मतपत्रिका इतरांना दाखविल्यास मतपत्रिका बाद केली जाईल;

ट) मतपत्रिकेवर फुलीची (X) किंवा बरोबरची (✓) खूण करुन मत नोंदविलेले असल्यास.

ठ) पसंती क्रमांक योग्य त्या दिलेल्या जागेवर नमूद केले नसल्यास.

ड) पसंतीचे क्रमांक एकाच अंकात नसल्यास (उदा. पसंतीचे क्रमांक अनुक्रमाने नोंद करतांना १, २, ३, ४ . . . . ऐवजी ०१, ०२, ०३, ०४ . . . . असे क्रमांक नोंद केल्यास मतपत्रिका अवैध होते.)

ढ) एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात आलेला पुढील पसंतीक्रम असलेली वैध मतपत्रिका अशा लगतनंतरच्या पसंतीक्रमासाठी मतपत्रिका अवैध ठरेल.

ण) मतदान कक्षात छायाचित्र/व्हीडीओचित्रण करण्यास सक्त मनाई आहे.

तरी सर्व संबंधितांनी उपरोक्त नियमावलीचे पालन करुन, मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यास विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी,
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

संदर्भ क्र.कबचौउमवि/०२/निवडणूक/१८/२०२३
दिनांक: १४.०३.२०२३

Xp:IBS_Niyamavali_Instructions_RG 2022_23